# नवभारत

नोव्हेंबर - २०२१

---

जनहित याचिका आणि न्यायालयीन सक्रियता

'दबिक'मध्ये इस्लामिक स्टेट (भाग - ३)


शेती, शेतकरी आणि शासन - लेखांक - ८

समाजधर्म आणि संस्कृती

धर्मशील मनाची निकड

कवितेतील विकास आणि विस्तार (स्वरूप व विवेचन)

जुने लेखन



ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S
DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
Dist.Nanded

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *

प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई संचालित मासिक

# नवभारत

वर्ष ७०। अंक २ । नोव्हेंबर २०१६
कार्तिक/मार्गशीर्ष शके १९३८
वार्षिक वर्गणी ४०० रुपये
या अंकाची किंमत रु. ४०/-

या अंकातील लेखांत व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व प्राज्ञपाठशाळा मंडळ सहमत असतीलच, असे नाही.

## नवभारतची भूमिका*

मानवाच्या व मानवसंस्कृतीच्या विकासास व उन्नतीस पोषक होईल अशा प्रकारे महाराष्ट्रीय जीवनाचा व संस्कृतीचा विकास करणे, हे या मासिकाचे ध्येय व उद्दिष्ट आहे.

ध्येयप्रवण व्यक्तींनी स्वोन्नतीच्या हेतुपूर्तीसाठी जे आपले सांस्कृतिक मूल्यमापन ठरविलेले असेल, उच्च वातावरणातील जो अभिजात अनुभव स्वतःच्या साधनेने संगृहीत केलेला असेल, त्याचे दिग्दर्शन हेच संस्कृतिपोषक वाङ्मय होऊ शकते, असा संचालक व संपादक-मंडळ यांचा विश्वास आहे.

या मासिकात येणाऱ्या लेखांत कोणत्याही विशिष्ट मताचा, वादाचा, पक्षाचा किंवा पंथाचा प्रचार करण्याचा हेतू नाही.

संचालक व संपादक-मंडळातील सर्व व्यक्ती यांचेही सर्व विषयांत मतैक्य आहे, असे नाही. मानवी जीवनविषयक व सांस्कृतिक मूल्यांसंबंधी सदृश अशा दृष्टिकोणानेच त्यांना एकत्र आणले आहे. तथापि प्रत्येकाचे व्यक्तिवैशिष्ट्य व विचारस्वातंत्र्य यांचा विनाश न होता विकास व्हावा, या दृष्टीनेच त्यांचे सहकार्य राहील. प्रत्येक व्यक्ती आपल्या नावाने प्रसिद्ध होणाऱ्या लेखाबद्दलच जबाबदार राहील.

मासिकात प्रसिद्ध होणाऱ्या प्रत्येक लिखाणात सत्यनिष्ठा, संयम आणि सहिष्णुता असतील, अशी काळजी घेतली जाईल.

*नवभारत, ऑक्टोबर १९४७, वर्ष १ ले, अंक १ मधील कै. शंकरराव देव यांच्या 'संचालकांचे मनोगत' मधून.

प्राज्ञपाठशाळामंडळ
अध्यक्ष व विश्वस्त :
सरोजा भाटे

संपादक :
श्री. मा. भावे

संपादक मंडळ :
यशवंत कळमकर,
अशोक कृष्णाजी जोशी

**संपादकीय पत्रव्यवहार :**
संपादक, *नवभारत* मासिक,
द्वारा : प्राज्ञपाठशाळा मंडळ,
वाई - ४१२८०३ (जि. सातारा).
फोन : (०२०) २५६७४०९३.

**व्यवस्थापकीय पत्रव्यवहार :**
नीता गायकवाड
व्यवस्थापक, नवभारत मासिक
द्वारा : प्राज्ञपाठशाळा मंडळ, ३१५, गंगापुरी,
वाई - ४१२८०३ (जि. सातारा)
फोन : (०२१६७) २२०००६.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाला अनुदान दिले असले, तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य-शासन सहमत असेलच, असे नाही.

# नवभारत

## नोव्हेंबर २०१६

## अनुक्रमणिका


- जनहित याचिका आणि न्यायालयीन सक्रियता — ३
  रत्नाकर बाबूराव लक्षटे
- 'दबिक'मध्ये इस्लामिक स्टेट (भाग - ३) — १४
  मुकुल रणभोर
- शेती, शेतकरी आणि शासन - लेखांक - ८ — १९
  श्री. के. वनपाल
- समाजधर्म आणि संस्कृती — २४
  अरविंद हसमनीस
- धर्मशील मनाची निकड — ३०
  जीवन आनंदगांवकर
- कवितेतील विकास आणि विस्तार (स्वरूप व विवेचन) — ३३
  आनंद यादव
  (नोव्हेंबर १९६६ च्या अंकातून)
- जुने लेखन — ३७


ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist. Nanded *

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S
DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
Dist.Nanded

# जनहित याचिका आणि न्यायालयीन सक्रियता

रत्नाकर बाबूराव लक्षटे

जनहित याचिका म्हणजे अन्यायग्रस्त व्यक्तीऐवजी अन्य व्यक्ती आणि संघटनांनी न्यायाची मागणी करणे. तसेच जर एखादी अन्यायग्रस्त व्यक्ती न्यायासाठी न्यायालयात जाण्यास सक्षम नसेल, तर अशा स्थितीत इतर व्यक्ती किंवा इतर संघटनांना अधिकार आहे की, ते अन्यायग्रस्त व्यक्तीऐवजी न्यायालयात याचिका दाखल करू शकतात. सामाजिक हिताची भावना असणाऱ्या व्यक्ती व संस्थांमार्फत जर एखादी व्यक्ती सर्वसामान्य लोकांशी निगडित प्रकरणाबाबत सर्वोच्च न्यायालय किंवा उच्च न्यायालयास पत्र लिहुन तक्रार करत असेल तर त्याबाबत न्यायालयामार्फत चौकशीअंती जनहित याचिका दाखल केली जाते. कोणतीही व्यक्ती वकिलाच्या मदतीने जनहित याचिका दाखल करू शकते. साधे पोस्टकार्ड, तार करून आलेल्या तक्रारीवरून ती दाखल करून घेतली जाते. आर्थिक व सामाजिक दृष्ट्या मागासलेल्या व्यक्तींसाठी ही व्यवस्था आहे, ज्यातुन त्यांना न्याय मिळेल. उदा., कामगारवर्गासाठी जनहित याचिका वरदान आहे. याशिवाय भ्रष्टाचाराबाबतही जनहित याचिकेने ऐतिहासिक निर्णय दिले आहेत. जनहितासाठी कोणीही न्यायालयात खटला दाखल करू शकतो. तज्ज्ञांनी वर्तमानपत्राच्या आधारे जनहित याचिका स्वीकारल्या व त्याबाबत महत्त्वपूर्ण निर्णय दिले. जनहित याचिका आणि न्यायालयीन सक्रियतेचा विस्तार समांतर रूपात झाला. जनहित याचिकांचे मध्यम वर्गाने अधिक प्रमाणात स्वागत व समर्थन केले. जनहित याचिका भारतीय राज्यघटना किंवा कोणत्याही कायद्यात परिभाषित केली गेलेली नाही. जनहित याचिकेस अमेरिकेत सामाजिक कार्यवाही याचिका म्हणतात. जनहित याचिका न्यायालयाचा आविष्कार आणि न्यायाधीशनिर्मित कायदा आहे. जनहित याचिका लोककल्याणभावनेने कार्य करते. स्वस्त व गतिशील न्याय हे जनहित याचिकेचे ध्येय आहे. जनहित याचिका समूहहितात उपयोगी पडते न की व्यक्तिहितात. जनहित याचिका मूलभूत अधिकाराच्या क्षेत्राचा विस्तार कसा करावा याकडे अधिक लक्ष देते.

न्यायालय गरीब, शोषित, उपेक्षित तथा पददलितांसाठी अंतिम ठिकाण आहे. आपले अस्तित्व, प्रतिष्ठा आणि सन्मानाचे संरक्षण करण्यासाठी प्रत्येक देशाचा सुसंस्कृत नागरिक न्यायालयाकडे जातो. प्रत्येक व्यक्तीस आपल्या हितसंबंधांच्या रक्षणाबाबत न्यायालयाकडून अपेक्षा असते. कारण तेथे त्याच्या हिताचे संरक्षण होते. न्यायालयाच्या निर्णयाचा सर्वसामान्य जनतेच्या मनावर अधिक प्रभाव असतो. प्रत्येक देशाने आपल्या शासनव्यवस्थेत न्यायालयास आदराचे स्थान दिले आहे. राज्य किंवा समाजाचे स्वरूप कसेही असो, विरोधाची शक्यता असल्यास श्रेष्ठ, स्वतंत्र व सक्षम न्यायपालिकेची नेहमीच गरज असते. कार्यपालिकेने डोळ्यांवर रंगीत चष्मा टाकला व तिचे कान रोगग्रस्त बनले, तर तिला आम आदमीचा आवाज ऐकु येत नाही. भ्रष्टाचाराने उच्छाद मांडला आहे. अशा परिस्थितीत गरिबांच्या व्यापक जनहिताचा विचार कोण करेल? तेव्हा आम आदमी विश्वासाने न्यायप्रणालीकडे पाहतो. भारतीय न्यायालयाने जनहितासंदर्भातील याचिकांवर निकाल देऊन त्या क्षेत्रात नवीन इतिहास जोडला आहे. जेव्हा कोणीही नागरिक जनसमूहाचे नुकसान व अहिताकडे सर्वोच्च किंवा उच्च न्यायालयाचे लक्ष केंद्रित करतो, तेव्हा न्यायालय अशा प्रकरणाचा निकाल लावून अधिकारपृच्छा, उत्प्रेषण, बंदी, प्रात्यक्षीकरण व परमादेशसारखे नियम लागु करते. अशा वेळेस याचिका दाखल करणाऱ्या व्यक्तीच्या अधिकाराचे उल्लंघन झाले किंवा नाही, याकडे न पाहता न्यायालय सर्वसामान्यांच्या नुकसानाचे आकलन करते.

जनहित याचिकेच्या विकासानंतरची प्रक्रिया न्यायालयीन सक्रियतेशी संबंधित आहे. न्यायालयीन

सक्रियता केव्हा केव्हा सामाजिक सक्रियता म्हणूनही पुढे येते. न्यायाधीश कोणत्याही वर्गातील असो, जेव्हा त्याच्यासमोर जनहितासंदर्भात प्रकरण येते, तेव्हा तो डोळे झाकून विचार करू शकत नाही.

**इतिहास :**

अमेरिकेतील गिडन विरुद्ध राऊट हे प्रकरण जनहित याचिकेसंदर्भातील पहिले प्रकरण आहे. १८७६ साली अमेरिकेतील ९ न्यायाधीशांच्या बेंचने याचिकाकर्त्यास आपल्या खटल्याची बहस करण्यासाठी अधिवक्ता नियुक्त करण्याच्या हेतुने परमादेशाचा आदेश दिला. न्यायालयाचा हा निर्णय सामाजिक न्यायाच्या क्षेत्रात मैलाचा दगड ठरला आहे.

भारतात सर्वप्रथम १९७९ साली कपिला हिंगोरानीच्या जनहित याचिकेस कायदेशीर मान्यता मिळाली. ज्यात एक महिला वकिलाने बिहार तुरुंगातील हुसनारा खतुन या कैद्याच्या नावाने इतर कैद्यांच्या स्थितीबाबत सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली. तत्कालीन सरन्यायाधीश कृष्णा अय्यर यांनी मुंबई कामगार विरुद्ध अब्दुल्ला भाई प्रकरणात वैयक्तिक स्वातंत्र्यासोबत असंख्य लोकांच्या हितांची रक्षा करण्यासाठी जनहिताची व्यापक व्याख्या करणे गरजेचे असल्याचे स्पष्ट केले. ज्यात ४० हजार कैद्यांची सुटका करण्यात आली. कृष्णा अय्यर यांनी असेच आणखी निर्णय देऊन न्यायव्यवस्थेत सुधारणा होण्याच्या अनुषंगाने सक्रियता आणण्याचा प्रयत्न केला.

जनहित याचिका कोणत्या न्यायालयासमोर दाखल करता येते? हा एक प्रश्न सर्वसामान्य जनतेसमोर असतो. संविधानातील कलम ३२ नुसार सर्वोच्च न्यायालयासमोर आणि कलम २२६ नुसार उच्च न्यायालयासमोर जनहित याचिका दाखल करता येते. केंद्रशासन, राज्यशासन, नगरपालिका किंवा कोणत्याही शासकीय विभागाविरुद्ध जनहित याचिका दाखल करता येते. ज्याप्रमाणे रिट याचिका दाखल केली जाते, अगदी त्याच प्रकारे जनहित याचिका दाखल करता येते. शीला विरुद्ध भारत संघ प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने जनहित याचिका एकदा दाखल केल्यास ती वापस घेता येत नाही, असा महत्त्वपूर्ण निर्णय दिला. रुरल लिटिगेशन एण्ड इंटाइटलमेंट केंद्र विरुद्ध उत्तर प्रदेश राज्य आणि रामशरण विरुद्ध भारत संघ प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने जनहित याचिकांच्या सुनावणीदरम्यान न्यायालयाने प्रक्रियेशी संबंधित ओपचारिकतेत पडू नय? जनहित याचिका दाखल झाल्यानंतर न्यायाचे स्वरूप काय असते? तर ते दोन प्रकारचे असते. एक, सुनावणीदरम्यान दिलेले आदेश; त्यात प्रतिकार, ओद्योगिक संस्थांना बंद करण्याचे आदेश व कैद्यांना जमानतीवर सोडण्याचे आदेश असतात. दुसरे, अंतिम सुनावणीदरम्यान दिलेले आदेश व निर्देश विशिष्ट कालावधीत लागु करण्याची तरतूद असते.

जनहित याचिकेस न्यायाधीश पी. एन. भगवती आणि वी. के. कृष्णा अय्यर यांनी १९७० च्या उत्तरार्धात प्रारंभ केला, ज्यास न्यायाधीश जे. एस. वर्मा, वेंकटचलैया आणि कुलदीप सिंह यांनी पुढे चालु ठेवले. न्यायाधीश पी. एन. भगवतींच्या मते कोणीही व्यक्ती एका पोस्टकार्डाद्वारेही सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका नोंदवू शकते. न्यायालय जनहित याचिकेसाठी एक समिती गठित करते, जिचे काम त्या प्रकरणाशी संबंधित सत्य स्पष्ट करणे असते. त्याचा संपूर्ण खर्च सरकार करते. या समितीच्या अहवालाचा आधार घेऊन न्यायालय संबंधित व्यक्तींना तशी सूचना देते. तदनंतर त्या प्रकरणाशी संबंधित सर्वांचे म्हणणे ऐकुन घेतल्यानंतर न्यायालय आपला शेवटचा निर्णय सुनावते.

जनहित याचिकेद्वारे अनेक गंभीर, क्लिष्ट व विवादास्पद प्रकरणांवर महत्त्वपूर्ण निर्णय देण्यात आले. परंतु आधीच न्यायालयीन कामकाजाचा बोजा असताना न्यायालयाने अतिरिक्त बोजा व ताण वाढवून घेतल्याची टीका होत आहे. विशेषतः दीर्घकालीन प्रकरणांत अधिक वेळ जातो. टीकाकारांच्या मते जनहित याचिकांची सुनावणी किंवा सोडवणूक जिल्हा न्यायाधीश किंवा तालुका, जिल्हा स्तरावरील न्यायालयात व्हावी. परंतू जनहित याचिकांच्या संदर्भात सर्वोच्च आणि उच्च न्यायालयांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. निम्नस्तरावरील निर्णय भय, लाचलुचपतींनी प्रभावित असु शकतात, असा एक तर्क यामागे आहे. तर असे होणे उच्च स्तरावर शक्य नाही. यातील जनहित याचिका जनमानसात न्यायभावनेस अधिक बळकटी प्राप्त करते. या प्रक्रियेतील उणिवांना संशोधनातुन

दूर करता येते, ज्यामुळे स्वच्छ आणि स्वस्थ न्यायालयीन व्यवस्थेचा उदय होईल.

**जनहितार्थ महत्त्वपूर्ण निर्णय :**

नगर परिषद रतलाम विरुद्ध बरदीच-१९८२ च्या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने जिल्हा न्यायाधीशांच्या निर्णयात बदल करताना म्हंटले, नगरपालिका सार्वजनिक हिताच्या संरक्षणासाठी साधनांची कमतरता सांगुन स्वतःचा बचाव करू शकत नाही.

एस. पी. गुप्ता विरुद्ध भारत संघ प्रकरण, जे न्यायाधीशांचे स्थानांतरण प्रकरण म्हणून ओळखले जाते. सर्वोच्च न्यायालयाने अधिवक्ता वर्गाकडून कायदा मंत्र्यामार्फत न्यायाधीशांच्या स्थानांतरण परिपत्रास जनहित प्रकरण समजून. त्यानंतर त्यावर आपला निर्णय दिला.

पीपल्स युनियन फॉर डेमोक्रेटिक राइट्स विरुद्ध भारत संघ - जे एशियाड प्रकरणाने प्रसिद्ध आहे, या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने जनहितसंरक्षणार्थ कार्य करणाऱ्या एका संस्थेच्या अर्जाचा स्वीकार केला. त्यामुळे एशियाई खेळासाठी मैदान बनवणाऱ्या कामगारासाठी खर्ची पडलेल्या श्रमांस कामगार कायद्यांतर्गत मानून कामगारांना आर्थिक लाभ द्यावा, असा आदेश दिला.

डी. एस. नकारा विरुद्ध भारत संघ या प्रकरणात सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या समस्यांविषयी लोकहितवाद प्रस्तुत करण्याच्या अधिकारास कायदेशीर अधिकार मानून याचिका स्वीकारण्यात आली.

हिमाचल प्रदेश विरुद्ध विद्यार्थी या प्रकरणात विद्यापीठ व महाविद्यालयस्तरावर रॅगिंगपरंपरेस विरोध करण्यासंदर्भात दाखल केलेल्या याचिकेस जनहित याचिका म्हणून स्वीकारण्यात आले.

सुनिल बत्रा विरुद्ध दिल्ली प्रशासन या प्रकरणात जनहितसंरक्षणार्थ सर्वोच्च न्यायालयाने तुरुंगप्रशासनात सुधारणा करण्याचे सुचवले. जुन्या जेल नियमांचा अभ्यास करून त्यांत सुधारणा करण्यावर भर दिला. तसेच कैद्यांना हातकडी घालू नये, याही निर्णयाविषयी स्पष्टीकरण केले.

सी. सी. जैन विरुद्ध राजस्थान राज्य प्रकरणात उच्च न्यायालय वकीलमंडळी विजेचे कनेक्शन नसल्यामुळे गर्मीने त्रस्त झाली होती. तेंव्हा याविषयी संबंधित याचिकेबाबत उच्च न्यायालयपरिसरात जनरेटर बसवावा, असा आदेश दिला. तरीही शासनाने त्या आदेशाकडे डोळेझाकपणा केला. त्यानंतर अपमानअर्ज दाखल झाला. तद्नंतर लगेच तेथे जनरेटरची व्यवस्था करण्यात आली.

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded

२०१४ च्या विधानसभा निवडणूकीत भाजपाने आघाडी सरकारच्या काळात १०२ घोटाळे, ११ लाख ८८ हजार कोटींचा भ्रष्टाचार, ५० हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या, अशी जाहिरात केली. त्याविषयी जनहित याचिका दाखल झाली.

२०१४ च्या लोकसभा निवडणूकीत २ लाख १० हजार १२३ मतदारांची नावे वगळण्यात आली. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या हत्येचे प्रकरण, अच्छे दिन केव्हा येणार? आदर्श घोटाळा, संजय दत्तला नेहमी मिळणारी पॅरोल, पीके चित्रपटातील आमीर खानचे अर्धनग्न चित्र, राधे माँ, ओपन जिम, कॉल ड्रॉप, कुंभमेळा पुरेशी सुरक्षा, दुहेरी नागरिकत्व, मालेगाव विस्फोट, बाबासाहेब पुरंदरेंना दिलेला महाराष्ट्र भूषण पुरस्कार, बजरंगी भाईजान चित्रपट, टोलप्रश्न, अनधिकृत बांधकाम, मराठा आरक्षण, एफटीआय आंदोलन इ. प्रकरणी न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आल्या.

जनहित याचिकेच्या दुरुपयोगाची नेहमीच शंका असते. यातील कांही प्रकरणांबाबत टीकाही झाल्या. स्वतः सर्वोच्च न्यायालयाने एका खटल्यात जर योग्य पद्धतीने नियंत्रित नाही केले, त्याच्या दुरुपयोगास नाही रोकले, तर ते अनैतिक मार्गाने प्रचार, बदला, वैयक्तिक व राजकीय स्वार्थपूर्ततेचे हत्यार बनु शकते, असे विधान केले. भारताचे मुख्य न्यायाधीश के. जी. बालकृष्णनने ८ ऑक्टोबर २००८ ला सिंगापूर लॉ अकादमीत जनहित याचिकेची प्रस्तुतता स्पष्ट केली. त्यांच्या मते जनहित याचिकेद्वारा न्यायालय कायदेमंडळाच्या मनमानी धोरणनिर्धारणात दखल देऊ शकते तसेच कार्यकारी मंडळास अंमलबजावाणी करण्यास कठीण असणारे आदेश देऊ शकते. ज्यामुळे शासनाच्या तीनही अंगांत असणाऱ्या सत्तासंतुलनाची अवहेलना होण्याचा न्यायाशी काहीच संबंध नाही. जनहित याचिकांनी न्यायालयात खटल्यांची संख्या वाढवून न्यायालयाच्या मुख्य कामास

प्रभावित केले अशीही तक्रार केली जाते. जनहित याचिकेस विषयाचे बंधन नाही. उदा., रस्ते, वृक्षतोड, मंदिरप्रवेश, पर्यावरण, शिक्षण, राजकारण, स्वच्छता, शोषण, हिंसाचार, निवडणुका, मानवी हक्क, शासकीय कर्मचारी, ध्वनिप्रदूषण, लैंगिक शोषण, सांप्रदायिक ऐक्य इ.

धनदांडगे, थैलीशहा, भांडवलदार व बाहुबलींच्या अन्यायाला बळी पडलेल्या अनेक शोषितांना या याचिकांमुळे न्यायाचा दरवाजा खुला झाला. परंतु बऱ्याच वेळा या याचिकांचे महत्त्व लक्षात आल्यावर जनहित याचिकेचा दुरुपयोग होऊ लागला. आपल्या विरोधी नेत्याला, मंत्र्याला, लोकप्रतिनिधीला, सनदी अधिकाऱ्याला अडचणीत आणण्यासाठी, त्याची बदनामी करण्यासाठी अशा याचिकांचा उपयोग होऊ शकतो. असा वापर करणाऱ्यांत राजकीय पक्षांचे नेते, कार्यकर्ते, स्वयंसेवी संस्थांची नेतेमंडळी अग्रभागी असतात. त्यामुळे न्याय मिळवण्याचा हा मार्ग पुरताच बदनाम झाला आहे. एखाद्या व्यक्तीच्या प्रतिष्ठेला डागाळण्यासाठी जनहित याचिकेचा वापर होऊ शकतो. सवंग लोकप्रियता मिळवण्यासाठी याचा वापर होत आहे. जनहित याचिकांच्या दुरुपयोगामुळे न्यायालयाचा वेळ वाया जातो. त्यामुळे अन्य खटले प्रलंबित राहतात. खोट्या हेतुने जनहित याचिका दाखल करणाऱ्यांना दंड करावा. गाव, वस्ती, वाडी, तांडा व जंगलात रहाणाऱ्या उपेक्षित मंडळींना स्वत: व खऱ्या अथवा त्यांच्या समूहावरील अन्यायाविरुद्ध, सरकारी यंत्रणेकडे व न्यायव्यवस्थेकडे दाद मागण्याची संधी, अधिकार म्हणजे जनहित याचिका होय. परंतु अलीकडे याच्या विश्वासार्हतेविषयी शंका निर्माण होऊ लागली आहे.

**न्यायालयीन सक्रियता :**

भारताच्या राज्यव्यवस्थेत अनेक महत्त्वाचे विषय आहेत. त्यांपैकी न्यायालयीन सक्रियता हा एक अत्यंत महत्त्वाचा व सध्याचा चर्चेचा विषय आहे. स्वातंत्र्यापासुनच न्यायालयाने भारतीय लोकशाहीचे संरक्षण आणि विकासात महत्त्वाची भूमिका बजावली. अलीकडील काळात न्यायालयाने अनेक प्रकरणांत दिलेल्या निर्णयांतून संपूर्ण देशाच्या जनतेचे लक्ष वेधले. सर्वांत प्रथम न्यायालयाने कार्यकारी मंडळाच्या दोषयुक्त कार्यप्रणालीवर कठोर ताशेरे ओढले. कायदेमंडळावर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न केला. आज देशातील प्रत्येक क्षेत्रात न्यायालयाची भूमिका महत्त्वपूर्ण ठरत आहे.

भारतीय राज्यघटनेतील प्रस्तावनेत भारतात धर्मनिरपेक्ष, समाजवादी, लोकशाही, गणराज्य घोषित केले. या प्रस्तावनेनुसार सामाजिक संतुलन टिकवणे शासनाचे प्रथमकर्तव्य आहे. धर्मनिरपेक्षता, लोकशाही व गणराज्यव्यवस्थेचे संरक्षण करणे, दुसरे कर्तव्य आहे. परंतु अलीकडील काळातील आमच्या देशाचे राजकारण अधिकच दूषित झाले. आमच्या राजकीय नेत्यांना पद, खुर्ची आणि जनतेचे मत यांशिवाय इतर कोणत्याही वस्तूची, विषयांची गरज वाटत नाही. ६९ वर्षांपूर्वी आमच्या देशातून इंग्रज गेले. परंतु इंग्रजी धोरणे सुरूच आहेत. इंग्रजांचे 'फोडा आणि राज्य करा' हे धोरण आजही भारताच्या राजकीय व्यवस्थेत कार्यरत आहे. राजकीय नेत्यांनी देशातील जनतेस मागासलेल्या जाती, आदिवासी जाती, अनुसूचित जाती, जनजाती यांत विभक्त केले. त्यासाठी आरक्षण, सवलतीसारख्या साधनांचा वापर करून आपली वोट बँक तयार केली. यातून सामाजिक असंतुलन निर्माण झाले. अशा परिस्थितीत न्यायालय पुढाकार घेऊन सामाजिक संतुलन निर्माण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

भारतीय राज्यघटनेच्या कलम १२४ ते १४७, कलम २१४ ते २३१ आणि कलम २३३ ते २३७ मध्ये सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालय आणि त्यांच्या अधीनस्थ न्यायालयांची तरतुद करण्यात आली. भारतात एकेरी न्यायव्यवस्था आहे, जी पिरॅमिडप्रमाणे आहे. ज्याच्या शीर्षस्थानी सर्वोच्च न्यायालय आहे. न्यायालयास कायदेमंडळ व कार्यकारी मंडळापासून वेगळे स्वतंत्र ठेवण्यात आले आहे. न्यायालये संविधानाचे संरक्षक आहेत. सर्वोच्च न्यायालयास न्यायिक समीक्षा करण्याचा अधिकार देण्यात आला. त्यामुळे कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळाद्वारे होणाऱ्या असंवैधानिक कार्यावर घटनात्मक तरतुदीअंतर्गत पायबंद करता येतो.

न्यायालयाची सक्रियता आज संपूर्ण देशात वादग्रस्त मुद्दा बनला आहे. भारतीय लोकशाहीत सर्वोच्च न्यायालयाच्या भूमिकेविषयी विचार करणारे कायदेतज्ज्ञ,

VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLUR

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist Nanded

## जनहित याचिका आणि न्यायालयीन सक्रियता

न्यायाधीश आणि संविधानाच्या जाणकारांची विभागणी दोन भागांत केली जाते. कायदेतज्ज्ञ आणि न्यायाधीश न्यायालयीन सक्रियतेस न्यायालयाची हुकूमशाही म्हणतात, तर संविधानाचे अभ्यासक त्यास भारतीय लोकशाहीसाठी शुभसंकेत मानतात.

कायदेपंडित आणि न्यायाधीशांच्या मते, जर लोकशाहीत लोकनियुक्त शासनामार्फत नियुक्त झालेले सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश प्रशासनाच्या सर्व क्षेत्रांत हस्तक्षेप करतील आणि कायदेमंडळ व कार्यकारी मंडळावर नियंत्रण ठेवतील, तर ती लोकशाहीची चेष्टा आहे. संविधानाचे अभ्यासक आणि सर्वसामान्य लोकांच्या मते, शासनाकडुन त्यांच्या उत्तरदायित्वाचे योग्य निर्वाहन होत नसल्यामुळे अस्थिरतेची परिस्थिती निर्माण झाली. त्यामुळे न्यायालयामार्फत शासन आणि त्यांच्या विविध अंगांना योग्य दिशा दाखवण्यासाठी प्रशंसनीय कार्य होत आहे.

वर्तमान लोकशाही व्यवस्थेत प्रशासनाच्या योग्य संचलनासाठी कार्यपालिका, कायदेमंडळ आणि न्यायमंडळ असे तीन स्वतंत्र विभाग स्थापन केले. कार्यकारी मंडळास कायदेमंडळाप्रती उत्तरदायी बनवले. परंतु न्यायपालिकेस पूर्णतः स्वतंत्र व संस्थेच्या स्वरूपात स्थापन करण्यात आले. लोकशाहीच्या यशस्वितेसाठी या तीन्ही अंगांचा एकत्रित प्रयत्न अत्यावश्यक आहे. अशा वेळेस कार्यकारी मंडळ आणि कायदेमंडळास न्यायपालिकेद्वारे मार्गदर्शन होणे, ही आनंदाची बाब आहे; न की चेष्टेचा विषय.

कायदेपंडितांच्या मते न्यायालयाने आपल्या अधिकार-क्षेत्राचा अनावश्यक विस्तार केला. कायदेनिर्मितीतही न्यायालय आणि न्यायाधीश हस्तक्षेप करत आहेत. ते जनतेद्वारा निवडलेल्या लोकप्रतिनिधींपेक्षाही अधिक शक्तिशाली बनत आहेत. कार्यकारी आणि प्रशासकीय क्षेत्रांत न्यायालयाची ताकत दिवसेंदिवस वाढत आहे. अशाच प्रकारे न्यायालयाच्या शक्तीत वाढ झाली, तर भारताच्या संसदीय शासनप्रणालीवर प्रश्नचिन्ह निर्माण होईल. न्यायालयात हुकूमशाही प्रस्थापित होईल. परंतु या विचारांच्या समर्थकांनी अमेरिकेच्या लोकशाही शासन व्यवस्थेचा अभ्यास करणे गरजेचे आहे. कारण जगात सर्वांत शक्तिशाली न्यायालय अमेरिकेचे आहे. जर न्यायालयाच्या शक्तिसंपन्नतेमुळे लोकशाही धोक्यात येणार असेल, तर अमेरिकेत लोकशाही व्यवस्थेचा विकास झालाच नसता.

अलीकडील काही वर्षांत भारतात प्रशासकीय व्यवस्थेच्या संदर्भाने काही परिवर्तन झाले. अगोदर कायदेमंडळाने कायदेनिर्मितीचे कार्य करावे, कार्यकारी मंडळाने कायद्यांना कार्यान्वित करणे आणि प्रशासनास स्थिर व सक्षम बनवण्याचे कार्य करावे आणि न्यायालयाने कायद्यांचा अर्थ लावणे व न्यायदानाचे कार्य करावे. परंतु आज कायदेनिर्मितीच्या क्षेत्रात वरील तीनही अंगांची भागीदारी सारखीच रहात आहे. कार्यकारी मंडळाच्या अधिकारक्षेत्रात कायदेमंडळाचे काही सदस्य मंत्रिमंडळाच्या रूपात शासन करतात. परंतु कायदेमंडळ उत्तरदायित्व किंवा आपल्या कार्यांच्या संवैधानिकतेसाठी न्यायालयाच्या निर्णयावर अवलंबून असते. न्यायालयाचे संघटन, अधिकारक्षेत्र आणि अधिकारांना निर्धारित करण्याचा किंवा त्यासंबंधी कायदे बनवण्याचा अधिकार संसदेला आहे. सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयाच्या न्यायधीशांची नियुक्ती राष्ट्रपतींमार्फत केली जाते. त्यांची पदच्युती राष्ट्रपती आणि संसदेद्वारा केली जाते. कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळात अन्योन्य संबंध असतात. या तिघांचे एकत्रित प्रयत्न जनतेसाठी हितकारक आहेत. देशाचा विकास तीव्र गतीने मार्गक्रमित होतो.

न्यायालयाचे अधिकारक्षेत्र संविधानाद्वारे निर्धारित करण्यात आले. परंतु खालील काही परिस्थितीत न्यायालय आपल्या अधिकारक्षेत्राबाहेर जाऊन काम करण्यास बाध्य होते–

१) जेव्हा शासन किंवा संसद आपल्या कर्तव्यांचे पालन करण्यात असमर्थ किंवा सक्षम रहात नाही, तेंव्हा मूलभूत अधिकारसंरक्षण, कायदा आणि संविधान-संरक्षण करण्यासाठी न्यायालयास हस्तक्षेप करण्याची मागणी केली जाते.

२) जेव्हा शासन अस्थिर किंवा कमकुवत होते; खंबीर निर्णय घेण्याच्या स्थितीत नसते; नागरिकांच्या अधिकारांचे संरक्षण करण्यात शासन अपयशी ठरते, तेव्हा नागरिक न्यायालयात शरण घेतात.

३) शासनाकडून एखाद्या प्रकरणात न्यायालयाची

मदत घेणे.

४) मानवी मूल्यांच्या संरक्षणासाठी न्यायालयाद्वारे स्वतः अधिकारक्षेत्राचा विस्तार करणे.

न्यायालयाची सक्रियता हा वादाचा मुद्दा बनण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे, अलीकडील कांही वर्षात न्यायालयाद्वारे देण्यात आलेले कठोर निर्णय. समान नागरिक कायद्यासाठी कायदा बनवावा, आरक्षणासाठी ५०% मर्यादानिर्धारण, न्यायाधीशांच्या नियुक्तीत सरकारची भुमिका, गुन्हेगारास न्यायालयाच्या परवानगीशिवाय हातकडी न घालणे, सरकारी अधिकाऱ्यांची बढती, उद्योगाचे स्थानांतर, प्रदूषण रोखणे इ. परंतु सर्वोच्च न्यायालयाकडून अलीकडे दिलेल्या निर्णयांपैकी काही निर्णयांवर कायदेपंडित आणि न्यायतज्ज्ञांमार्फत प्रश्नचिन्ह निर्माण केले जाते. त्या निर्णयाचे सूक्ष्म अध्ययन केल्यास असे जाणवते की, ते निर्णय न्यायसंगत आहेत. आणि परिस्थितीनुरूप आवश्यक आणि अनिवार्य आहेत. अपवादरूपानेही काही निर्णय अनावश्यक व अयोग्य मानता येतील. परंतु अपवाद हे सर्वत्रच असतात. त्यामुळे न्यायालयाचे निर्णय प्रशंसनीय आहेत. अशा प्रकारे न्यायालय कायदेमंडळ आणि कार्यपालिकेच्या अराजक व्यवस्थेत त्रस्त व्यक्तींसाठी आशेचा किरण म्हणुन पुढे येत आहे.

शासन दिवसेंदिवस कमकुवत बनत आहे. त्याची अकार्यक्षमता व अश्रद्धा वाढत आहे. संपूर्ण व्यवस्था भ्रष्ट बनली आहे. कोणत्याही प्रकारे सत्तेत टिकून रहाण्याच्या प्रवृत्तीने शासनवर्गातील मनुष्यत्वास समाप्त केले आहे. तसेच देशाच्या घटनात्मकतेलाही संकटात टाकले आहे. अशा परिस्थितीत सर्वोच्च न्यायालयाकडून दिलेल्या निर्णयांचे स्वागत करण्यात आले.

परंतु न्यायालयीन सक्रियेतत वाढ होऊन प्रशासनातील दोष समाप्त होणार नाहीत. त्यासाठी कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळांनी निष्पक्ष रूपात कार्य करणे गरजेचे आहे. न्यायालयाने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करावी. तसेच आपले निर्णय पक्षपात व राजकारणाने प्रेरित नसावेत याची न्यायालयाने दक्षता घ्यावी.

**न्यायदानात विलंब :**

मुख्य न्यायाधीश के. जी. बालकृष्णन यांनी १२



डिसें. २००९ ला बेंगलूर येथील [illegible] न्यायदानात होणाऱ्या विलंबाविषयी वापरलेला [illegible] विधान [illegible] करणारे आहे. त्यास त्यांच्या प्रदीर्घ अनुभवाचा आधार आहे. त्यांच्या मते खटल्यात लोकांना न्याय मिळण्यात होणाऱ्या विलंबामुळे लोक विद्रोह करण्यास तयार होतील. अशा स्थितीपासून वाचायचे असेल, तर आम्हास जलद न्याय देणारी यंत्रणा व स्थिती निर्माण करावी लागेल.

भारतात उशिरा मिळणारा न्याय अधिक काळापासून चर्चेचा विषय बनला आहे. बऱ्याच अधिकतर प्रकरणांचा निकाल लागण्यासाठी १५ वर्षांचा कालावधी लागतो. एवढा अधिक काळ सहनशील रहाणे शक्य नाही. एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत चालणाऱ्या प्रकरणाची संख्या बरीच आहे. काही प्रकरणे एका न्यायालयातून दुसऱ्या न्यायालयात स्थलांतरित होत असतात. दिवाणी खटल्याबाबत दाखल केलेल्या प्रकरणाचा निकाल आपल्या नातवास ऐकायला मिळाला तरी ठीक आहे, अशी चर्चा ऐकण्यास येते. न्यायप्रणालीकडून न्यायदानास होणारा विलंब त्यास अन्यायप्रणालीसदृश बनवतो.

विलंबित न्यायाबाबत आपणांस दोन दृष्टिकोणातून विचार करावा लागेल. एक, वर्तमान न्यायप्रणालीतहतच विचार करणे; दोन, उपलब्ध न्यायप्रणालीच्या बाहेर जाऊन विचार करणे. न्यायाधीश बालकृष्णन यांनी या न्यायव्यवस्थेतहतच आपले विचार मांडले. खटल्यांची वाढती संख्या आणि न्यायालय व न्यायाधीशांच्या कमी संख्येस त्यांनी मुख्य कारण मानले. आमच्या देशात जवळपास १६ हजार निम्न स्तरांतील न्यायालय आहेत ज्यांत न्यायाधीशांच्या संख्येत दोन हजारांची कमतरता आहे. मुख्य न्यायाधीशांच्या मतानुसार, न्यायालयाची संख्या तत्काळ ३५००० करावी आणि त्यासाठी न्यायाधीशांची निवड करावी लागेल. न्यायालयीन सुधारणेत सक्रिय असणाऱ्या अनेक संस्थांनी अशी सुधारित आकडेवारी दिली. भारतात साधारणतः प्रति १० लाख लोकसंख्येवर १५ न्यायाधीश आहेत, तर कॅनडात ७५ आणि अमेरिकेत १०४ आहेत. म्हणूनच आपणास न्यायव्यवस्थेत दुरुस्ती करण्यासाठी आधुनिक, आधारभूत, रचनात्मक कार्यपद्धती तयार करावी लागेल, जे एक फार मोठे आव्हान आहे. देशातील संविधानतज्ज्ञ, कायदेपंडित आणि न्याय[illegible]

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist. Nanded

प्रक्रियेशी संबंधित लोकांमध्ये प्रचलित न्यायव्यवस्थेविषयी अत्यंत चुकीच्या धारणा आहेत. भारतात इंग्रजांनी ज्या न्यायव्यवस्थेची स्थापना केली, तेथूनच आमच्या कोर्टात खटल्याची सुरुवात होते. वास्तविक न्याय अधिक धूसर होत जातो. स्वातंत्र्यानंतर जेवढी सुधारणा होणे अपेक्षित होते, तेवढी झाली नाही. न्याययंत्रणेचा वास्तवतेशी संबंध नसणे, ही एक फार मोठी कमतरता आहे. संपूर्ण देशासाठी जवळपास एकच कायदा आणि न्यायदानाचा एकच मार्ग. कायद्याच्या पुस्तकात असलेले अनेक अपराध विभिन्न जीवनशैली व परंपरेचा भाग आहेत. कायदा आणि कायद्याची प्रक्रिया आम आदमीच्या आकलनशक्तीबाहेरील आहे. आम आदमी न्यायालयात जाताच स्वतःस अपंग आणि निस्तेज अवस्थेत असल्याचे समजतो. इंग्रजांच्या अगोदरची न्यायप्रणाली मुलतः स्थानिकतेवर आधारित होती. मध्यस्थी, वाटाघाटी आणि करार आमच्या समाजाचा स्थायी स्वभाव होता. कालांतराने त्यात दोष निर्माण झाले. परंतु संस्कृतीचा एक भाग म्हणुन ती पद्धत काही ठिकाणी टिकून आहे. न्यायाधीशांच्या मते चीनमध्ये ८०% प्रकरणे यात गुंतून राहतात. फक्त २०% प्रकरणे न्यायालयात येतात. त्याउलट, स्थिती भारतात आहे. फक्त ५% प्रकरणे मध्यस्थता आणि सामंजस्याने सुटतात. वास्तवतेत पारंपरिक न्यायप्रणालीस पुनर्जीवित आणि सशक्त करण्याची आवश्यकता आहे. तसेच न्यायालयीन सुधारणांची गरज आहे, ज्यातून न्यायदानात होणारा विलंब आणि इतर समस्या नष्ट करता येईल.

**न्यायिक उत्तरदायित्व :**

न्यायिक उत्तरदायित्वाच्या मुद्द्याने सार्वजनिक चर्चेचे रूप धारण केले, जे भारतीय लोकशाहीसाठी शुभसंकेत आहे. अलीकडेच न्यायालयीन व्यवस्थेत पारदर्शकता आणि उत्तरदायित्वाच्या मागणीत वाढ होत आहे. सर्वोच्च आणि उच्च न्यायालयाचे न्यायाधीश व भारताच्या मुख्य न्यायाधीशास माहितीच्या अधिकारांतर्गतच्या प्रश्नाप्रती उत्तरदायी बनवण्याविषयीचे तथ्य समोर येत आहे. संयुक्त राज्य अमेरिकेतील सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीश वर्तमानपत्रात आपली व्यक्तिगत संपत्ती जाहीर करतात, तर इंग्लंडचे सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीशांसंबंधित सर्व प्रकारची माहिती तेथील माहिती अधिकार कायद्यांतर्गत येते. भारताच्या न्यायालयातील न्यायाधीशांची संपत्ती, नियुक्ती आणि त्यांच्यावरील भ्रष्टाचार व इतर आरोपांविषयीच्या माहितीचा समावेश माहिती अधिकारांतर्गत करण्यात आला आहे.

संयुक्त राज्य अमेरिकेत न्यायाधीशांना १०० डॉलर किंवा त्यापेक्षा अधिक किंमतीच्या बक्षिसांची सार्वजनिक घोषणा करावी लागते. ब्रिटिश शासनाने संगणकाचा दुरुपयोग करणाऱ्या न्यायाधीशांची यादी तयार करण्याचे आदेश दिले होते. ब्रिटनमध्ये न्यायाधीशांच्या नियुक्तीस न्यायालयीन नियुक्ती आयोगात आव्हान देता येते. जनतेस असा अधिकार आहे की, ते न्यायाधीशांविरुद्धचे भ्रष्टाचार आणि दुर्व्यवहाराची तक्रार न्यायालयीन व्यवहार आयुक्ताकडे करू शकते. जर याचिकाकर्ता संतुष्ट नसेल, तर तो त्या देशांतील न्यायिक लोकायुक्ताकडे अपील करू शकतो. एप्रिल २००८ ला एका माहिती अधिकाराच्या निवेदनात सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश मुख्य न्यायाधीशासमोर आपल्या संपत्तीचा तपशील दाखल करू शकतात का? हे विचारण्यात आले. त्यानंतर भारताचे मुख्य न्यायाधीश श्री. के. जी. बालकृष्णन यांनी त्याविषयी विधान केले की, त्यांचे पद माहिती अधिकार कायद्यांतर्गत येत नाही. कारण ते घटनात्मक पद आहे. तद्नंतर सोमनाथ चटर्जींनी मुख्य न्यायाधीशांच्या विधानास कायदेशीर आव्हान देऊन माहिती अधिकाराचा कायदा सर्व जनकर्मचाऱ्यांना लागू होतो, असे विधान केले.

मुख्य न्यायाधीशांच्या विधानानंतर सर्व घटनात्मक पदे माहिती अधिकाराच्या कक्षेबाहेर आहेत का? ती सर्व पदे जनसेवा अंतर्गत येत नाही का? याविषयी विवाद निर्माण झाला. त्याविषयी दिल्ली उच्च न्यायालयाने १२ फेब्रुवारी २०१० ला एक ऐतिहासिक निर्णय देताना म्हटले की, भारताच्या मुख्य न्यायाधीशाचे पद माहिती अधिकार अधिनियमाच्या कक्षेत येते. न्यायालयाच्या मते, न्यायालयीन स्वातंत्र्य कोणत्याही न्यायाधीशाचा व्यक्तिगत परमाधिकार किंवा विशेषाधिकार नाही. उलट, ते कायदा आणि पुराव्याच्या आधाराने प्रामाणिकपणा आणि निःपक्षपाती-पणाने निर्णय घेण्यासाठी प्रत्येक न्यायाधीशावर टाकलेली जबाबदारी आहे. दिल्ली उच्च न्यायालयाच्या पूर्ण पीठाने भारताचे मुख्य न्यायाधीश एक कायदेशीर

लोकाधिकारी आहेत, असे स्पष्ट केले. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांनी आपली संपत्ती सार्वजनिकपणे जाहीर करावी. कारण त्यांच्या सेवा नियमावलीत संपत्ती घोषित करण्याची शर्त आहे.

पारदर्शक न्यायालयाशिवाय भारतासारखे सक्षम लोकशाही राष्ट्र शक्य नाही. अशा परिस्थितीत आमच्या न्यायालयीन संस्थांना पुर्णतः विवादहीन आणि नैतिक बनवण्याचा प्रयत्न आहे. न्यायालयीन मापदंड आणि जबाबदारी विधेयक २०१० हे त्या दिशेने टाकलेले मोठे पाऊल आहे. हा कायदा बनल्यानंतर तो न्यायाधीश चौकशी कायदा, १९६८ ची जागा घेतो. वर्तमान न्यायाधीश चौकशी कायद्याचा एक फार मोठा दोष आहे की, त्यात न्यायालयीन तक्रारीशी संबंधित तपासाबाबत काही स्थिर प्रयोजन नाही. न्यायव्यवस्थेच्या शीर्षस्थानावरील व्यक्तीच वादग्रस्त प्रकरणात गुंतलेल्या असतील, तर मार्ग कोणी दाखवावा? आज न्यायालयीन यंत्रणेतील भ्रष्टाचाराच्या तक्रारी स्वतः न्यायालयातूनच समोर येत आहेत. भ्रष्ट न्यायाधीशांविरुद्ध महाभियोगासारखी तरतुद आहे. परंतु ती अधिक काळ लावणारी आणि राजकारण्यांच्या स्वार्थामुळे अव्यवहार्य बनली. त्यामुळे बऱ्याच काळापासुन उच्च न्यायालयीन सेवेत मापदंड निर्माण करणाऱ्या आणि न्यायालयीन कर्तव्याचे संचलन वेळेवर होणाऱ्या कायद्याची आवश्यकता आहे. या विधेयकात उच्च न्यायालयीन संस्थांतील गैरव्यवहार व भ्रष्टाचाराशी संबंधित प्रकरणाचा तपास तीन न्यायाधीशांच्या समितीकडून होण्याची तरतूद असावी.

जर प्रश्न गंभीर असेल, तर त्यास उपराष्ट्रपतींच्या अध्यक्षतेखाली असणाऱ्या न्यायालयीन समितीकडे सुपूर्द करावे. या समितीत न्यायाधीशाद्वारे निवडलेले उच्च न्यायालयाचे न्यायाधीश आणि राष्ट्रपतीद्वारे नियुक्त दोन कायदेतज्ज्ञ असावेत. न्यायालयीन उत्तरदायित्वास व्यापकता देण्यासाठी देशातील सर्व उच्च न्यायालयांत चौकशी समितीचे गठण करण्याची तरतूद आहे. या विधेयकाने न्यायालयीन संस्थांवर नजर ठेवण्याचे कार्य करावे. तसेच न्यायालयीन कार्याचा अतिरिक्त बोजा कमी करण्यासाठी प्रयत्न करावे. प्रकरणाची सुनवाई पूर्ण होण्याच्या तीन महिन्यांत निर्णय देण्याची तरतूद आहे.

न्यायालयीन उत्तरदायित्वास सक्षम करण्यासाठी शासन राष्ट्रीय न्यायालयीन आयोग स्थापन करण्याची योजना बनवत आहे. वर्तमानात सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयांच्या न्यायाधीशांच्या नियुक्तीत कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळाची कोणतीच व्यावहारिक भुमिका नाही. नियुक्ती न्यायालयाद्वारेच केली जाते. यासाठी दोषी न्यायाधीश हटवणे कठीण आहे. यासाठी त्या दिशेने एक न्यायिक आयोगाची स्थापना करावी, जो न्यायाधीशांची नियुक्ती व बडतर्फीसंदर्भात प्रकरणे पाहील. यास न्यायाधीशांविरुद्ध दंडात्मक कार्यवाही करण्यासंदर्भात अधिकार असावा. शेवटी स्वतंत्र न्यायालयाचे समायोजन अत्यंत आवश्यक आहे. कारण ते लोकशाहीचा आत्मा आहे. कोणत्याही स्वरूपात त्यांची परिणामकारकता आवश्यक आहे. त्यांची सक्रियता आणि उत्तरदायित्वामुळेच विकसित नागरी समाज शक्य आहे.

**न्यायालयीन सुधारणेची आवश्यकता :**

न्यायालय राष्ट्राच्या लोकशाही व्यवस्थेचा महत्त्वपूर्ण स्तंभ आहे. त्यासाठीच न्यायपालिकेत सुधारणेची चर्चा वारंवार होते. घटनेचा संरक्षक असल्यामुळे ती त्याची जबाबदारी आहे. स्वातंत्र्याच्या ६८ वर्षांनंतरही भारतीय न्यायालयीन व्यवस्थेपर्यंत जनसामान्यांना सहजपणे पोचता येत नाही.

आज न्यायालयीन व्यवस्थेची शक्ती, अधिकार-रचना, न्यायालयीन निष्पादन आणि प्रशासन हा काळजीचा विषय आहे; ज्याचे लवकर समाधान होणे अपेक्षित आहे. महत्त्वपुर्ण गोष्ट अशी की, भ्रष्टाचाराचा अभ्यास करणारी मुख्य संस्था ट्रान्सफरन्सी इंटरनॅशनलने वर्ष २००७ साली आपल्या रिपोर्टमध्ये भारतातील न्यायपालिकेस तिसरे सर्वात भ्रष्ट क्षेत्र मानले. तसेच सेंटर फॉर मीडिया स्टडीजने आपल्या एका अभ्यासात भारतातील ७७% लोक न्यायालयीन व्यवस्थेस भ्रष्ट मानतात, असे सांगितले. अनेक कुटुंबाचे मानणे आहे की, न्यायालयीन सेवा, त्वरित निपटारा, पक्षपाती निर्णय, शपथपत्र आणि जमानत प्राप्त करण्यासाठी लाच अधिक प्रमाणात घेतली व दिली जाते. या सर्व तथ्यांतून न्यायालयीन व्यवस्थेत सुधारणेची गरज स्पष्ट होते.

### जनहित याचिका आणि न्यायालयीन सक्रियता

विधी आयोगाने १९८७ व १९८८ ला शिफारस केली की, सर्वोच्च न्यायालयात शिफटव्यवस्था लागू करावी. कारण कमी गुंतवणुकीवर अधिक कार्य होईल. तसेच न्यायाधीशांच्या संख्येत वाढ करावी. ज्यामुळे वर्ष २०२० पर्यंत प्रत्येक १० लाख लोकसंख्येस १०७ न्यायाधीशांचे लक्ष्य प्राप्त करता येईल.

१९९९ साली शेट्टी आयोगाने न्यायालयीन अधिकाऱ्यांच्या वेतन व भत्त्यात वाढ करण्याची आणि सर्वच न्यायालयांसाठी एकरूप सेवाशर्ती लागू करण्याची सूचना केली. मलिमथ समितीने वर्ष २००३ मध्ये न्यायाधीशांच्या पात्रतेची समीक्षा करण्याचा प्रस्ताव ठेवला. कारण उच्च क्षमता असणाऱ्या न्यायाधीशांच्या नियुक्तीने सर्व न्यायाधीशांना प्रशिक्षण देणे उपयुक्त ठरेल.

### न्यायालयीन सुधारणा आणि आर्थिक समृद्धी :

निश्चितच कुशल व कार्यक्षम कार्यालयीन व्यवस्थेत आणि आर्थिक समृद्धतेत परस्परसंबंध आहे. त्वरित आणि कुशल न्यायदान, बाजारविकास, परकीय गुंतवणूक, संपत्ती अधिकार व गरिबी निर्मूलनात साहाय्यभूत ठरेल. बॉन विद्यापीठाने एका अभ्यासात पारदर्शक व कुशल न्याय प्रतिव्यक्ति उत्पन्नात १.९% पर्यंत वाढवू शकतो असा निष्कर्ष काढला. अनेक शोध आणि अभ्यासांतून हे स्पष्ट झाले की, न्यायालयाची दयनीय अवस्था देशासाठी अधिक घातक सिद्ध होते. हॉवर्ड लॉ स्कूलच्या रिपोर्टनुसार न्यायालयव्यवस्थाच पंगू होण्यामुळे ब्राझिलचे सकल घरेलू उत्पादन २०% पर्यंत घसरले. भारताच्या विभिन्न न्यायालयांत ३ करोडपेक्षा अधिक प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यांच्या आर्थिक गुंतणूकीचा अंदाज आपण लावावा.

सुस्त न्यायव्यवस्था व्यापारी करार आणि नवीन गुंतवणुकीस कमकुवत करते. लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सने आपल्या अभ्यासात स्पष्ट केले की, प्रलंबित प्रकरणे आणि व्यापारात एक, परस्परपुरक संबंध असतो. ६०% पेक्षा अधिक कंपन्या किंवा व्यापारी संस्था त्याच राज्यात आपला व्यापार वाढवतात ज्या राज्यात विवादांचा निपटारा न्यायालयातून लवकर होतो.

### न्यायालयीन सुधारणेचे उपाय :

१) न्यायाधीशांची संख्या १४,००० वरून ५०,००० करावी.

२) न्यायालये माहिती तंत्रज्ञानाच्या साधनांशी जोडावी, ज्यामुळे कार्यकुशलता वाढते.

३) लोकअदालत, कुटुंब न्यायालय, ग्राम न्यायालय यांची जास्तीत जास्त स्थापना करावी.

४) न्यायाधीशांना क्लिष्ट व गुंतागुंतीच्या सफल संचलनासाठी योग्य प्रशिक्षण द्यावे.

५) स्वतंत्र विभागाद्वारे न्यायाधीशांची नियुक्ती निष्पक्षपातीपणाने व्हावी.

६) राष्ट्रीय न्यायालयीन परिषदेचे त्वरित गठन व्हावे. कारण त्यामुळे न्यायाधीश आणि न्यायपालिकेच्या भ्रष्टाचारावर अंकुश ठेवता येईल.

७) विधिव्यवसायात गतीने सुधारणा होणे आवश्यक आहे. त्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावरील विधी विद्यापीठ व महाविद्यालयांची स्थापना करावी.

८) केंद्रीय कायदामंत्री वीरप्पा मोईलींच्या मते देशात दीड लाख कैद्यांना मुक्त करावे. तसेच त्यांनी स्वत: एका विशेष न्यायालयात जाऊन प्रेक्षकांत बसून न्यायाधीशांचा धीर वाढवला. त्या न्यायाधीशाने एका दिवसात ४० प्रकरणांचा निपटारा केला. तसेच ५८ कैद्यांना मुक्त केले.

वास्तवतेत कमकुवत न्यायव्यवस्था गोंधळ, अव्यवस्था व गरिबीत वाढ करते. गुन्हेगारीची प्रकरणे तीव्र होतात. तसेच वाईट लोक आपली पकड मजबुत करतात. अशा वेळेस समता, स्वातंत्र्य आणि बंधुता, जे लोकशाहीचा आदर्श आणि उद्देश आहेत, ते धूसर होतात. निश्चित रूपाने न्यायालयीन सुधारणेत होणारा खर्च हा देशाचा भविष्यातील आर्थिक विकास निधी व गुंतवणूक आहे. प्रसिद्ध नोबेल पुरस्कारप्राप्त अर्थशास्त्रज्ञ अमर्त्य सेनच्या मते एक यशस्वी न्यायालयीन व्यवस्था विकास-प्रक्रियेचा एक महत्त्वाचा भाग आहे. कारण ते आर्थिक समृद्धतेच्या वृद्धीत साहाय्यक आहे. तसेच नागरिकांत समता, अधिकार व बंधुत्वाचे रक्षण करते.

सर्वोच्च न्यायालयाने वर्ष २०११ मध्ये मुख्य दक्षता आयुक्त पी. जे. थॉमसची नियुक्ती रद्द करून पुन्हा जनहित प्रकरणाशी संबंधित प्रकरणात सक्रियता दाखवली. मुख्य दक्षता आयुक्ताची निवड पंतप्रधान, गृहमंत्री आणि

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S
DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
Dist. Nanded

लोकसभेतील विरोधी पक्षाचा नेता यांनी मिळून बनलेल्या एका समितीकडून होते. १५ व्या लोकसभेतील विरोधी पक्षनेत्या सुषमा स्वराज यांनी निवडीच्या वेळेसच आपले वेगळे मत व्यक्त करून थॉमसच्या निवडीस विरोध केला होता. या प्रकरणात शेवटी सर्वोच्च न्यायालयाने मुख्य दक्षता आयुक्तांची नियुक्ती रद्द करून जनहितार्थ प्रकरणात आपली भूमिका स्पष्ट केली.

भारतीय सर्वोच्च न्यायालयाने नेहमीच लोककल्याणाशी संबंधित प्रकरणांत रुची व गांभीर्य दाखवले. सर्वोच्च न्यायालयाने २ जी स्पेक्ट्रम प्रकरणात शासनासमोर उभ्या केलेल्या प्रश्नांचे उत्तर देणे शासनास कठीण बनले होते. प्रकरण शेवटी लोकलेखा समिती आणि संयुक्त संसदीय समितीकडे सोपवण्यात आले, जे भारतीय न्यायालय, कार्यकारी मंडळ यांच्याद्वारा घेण्यात आलेल्या निर्णयांची समीक्षा करते. काही प्रकरणांत ते शासनाच्या नीति-निर्धारणाचे मापदंड ठरवते. भारतीय संविधानातील कलम १३७ सर्वोच्च न्यायालयास हा अधिकार देते की, ते पास मागु शकते वा निकाल देऊ शकते. भारताची जनता न्यायालयीन आदेशाबाबत कांही अपवाद सोडले तर नाराज दिसते. न्यायालयीन आदेशांनी नेहमीच जनतेचा विश्वास जिंकण्यात यश मिळवले.

एका तुलनात्मक अभ्यासातुन हे स्पष्ट होते की, भारतीय सर्वोच्च व समकक्ष न्यायालय, हे अमेरिका, इंग्लंड, कॅनडा, दक्षिण अफ्रिकेच्या तुलनेत अधिक सक्रिय आणि प्रशासकीय प्रकरणांत हस्तक्षेप करणारे आहे. भारतात शासनासोबतच विरोधी पक्षातील अनेक मोठ्या राजकीय नेत्यांना न्यायालयाचे आदेश त्रासदायक ठरले. प्रकरण २ जी स्पेक्ट्रम, मग ते असो वा मुख्य दक्षता आयुक्ताची निवड असो, अनेक भ्रष्टाचाराची प्रकरणे या सर्वांत न्यायालयाच्या आदेशाने सुशासनाची स्थापना करण्यात सहकार्य केले. स्वतःस लोककल्याणकारी राष्ट्र म्हणून घोषित करणाऱ्या प्रत्येक देशास सामाजिक-आर्थिक सुधारणेस पोषक धोरणे ठरवावी लागतात. आजपर्यंत भारतात प्रशासकीय निष्काळजीपणामुळे त्यांची योग्य अंमलबजावणी होत नसल्याचे दिसून येते. लोकांच्या जीवन जगण्याच्या गुणवत्तेत सुधारणा व्हावी अशी न्यायालयाची भुमिका आहे. प्रशासकीय व्यवस्थेत



सुधारणा व्हाव्यात, त्याची अंमलबजावणी [illegible] संस्थांच्या क्षमतेत व गुणवत्तेत [illegible] सक्षम, पारदर्शक, वैध, लोककल्याणकारी, [illegible] प्रशासकीय व्यवस्थेची स्थापना व्हावी, भ्रष्टाचारापासून मुक्त जनसेवा लोकांना मिळाव्यात, ही अपेक्षा.

न्यायालयांस आपले निर्णय लागू करण्यासाठी शेवटी कार्यकारी मंडळ आणि कायदेमंडळावरच अवलंबून रहावे लागते. संविधानातील या दोन अंगांवर व त्यांच्या सहकार्यावरच न्यायालयाचा सन्मान अवलंबून आहे. शेवटी न्यायालयाने आपला निर्णय देताना त्याच्या व्यावहारिक घटकाप्रती अधिक जागरूक असावे. कोणत्या निर्णयाने व कार्याने सामाजिक न्यायाची स्थापना होईल, याकडे न्यायालयाने अधिक लक्ष व भर द्यावा. तरीही न्यायालयीन सक्रियतेस अधिक संतुलित रीत्या जिवंत ठेवावे लागेल. तसेच यामुळे राज्याच्या विभिन्न अंगांतील सत्ताविकेंद्रीकरणाच्या संकल्पनेस बळ मिळेल. शेवटी न्यायालयालाच नियंत्रित राहुन न्यायालयीन सक्रियतेच्या प्राप्तीसाठी कार्य करावे लागेल. न्यायालयात वकील, कर्मचारी, उच्च न्यायालय, सत्र न्यायालय, कनिष्ठ न्यायालय, न्यायाधीश व सी. सी. टी. व्ही. कॅमेऱ्यांचा अभाव असणे हा जनहित याचिका व न्यायालयीन सक्रियतेच्या यशस्वितेसमोरचा अडथळा आहे.

**संदर्भ ग्रंथ :**


१) २१ व्या शतकातील बदलते समाजकारण आणि राजकारण, डॉ. अलका देशमुख, साईनाथ प्रकाशन, नागपूर.

२) भारतीय राज्यघटनाः राष्ट्राची कोनशिला, ग्रॅन्व्हिल ऑस्टिन, अनुवाद - भारती केळकर, डायमंड पब्लिकेशन्स पुणे.

३) इमॅर्जिनिंग इंडिया, नंदन निलकेणी, अनुवाद - अपर्णा वेलणकर, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

४) भारताच्या संसदीय लोकशाहीची अग्निपरिक्षा, माधव गोडबोले, अनुवाद - सुजाता गोडबोले, राजहंस प्रकाशन, पुणे.

५) भारतीय संविधान, राजकारण आणि कायदा, स्मिता जोशी, Person Publication, Delhi.

६) लोकशाहीचे व्याकरण, अनुवाद - शारदा साठे, [illegible]

जनहित याचिका आणि न्यायालयीन सक्रियता

पी. बी. सावंत, भाष्य प्रकाशन, मुंबई.

७) भारतीय संविधान व भारतीय राजकारण, तुकाराम जाधव-महेश शिरापूरकर, युनिक अकॅदमी, पुणे.

८) भारतीय राज्यव्यवस्था, सई पांडे-मुक्ता कुलकर्णी, युनिक अकॅदमी पुणे.

९) भारतीय राज्यघटना व प्रशासन, रंजन कोळंबे, भगीरथ प्रकाशन, पुणे.

---

दुसरी संवर्धित आवृत्ती

## हिंदू धार्मिक परंपरा आणि सामाजिक परिवर्तन

मे. पुं. रेगे

भारतातील नवसमाजउभारणीचे ध्येय साधण्यासाठी आधारभूत होऊ शकणाऱ्या भारतीय नैतिक-आध्यात्मिक परंपरेचे सुबोध दिग्दर्शन करणाऱ्या ग्रंथाच्या या संवर्धित आवृत्तीत प्रा. शि. स. अंतरकर आणि प्रा. स. ह. देशपांडे यांचे परीक्षण-लेख, मा. मे. पुं. रेगे यांनी अंतरकर यांच्या परीक्षणाचा घेतलेला परामर्श आणि प्रा. स. ह. देशपांडे यांच्या परीक्षणाचा प्रा. रेगे यांच्या विचारव्यूहाच्या संदर्भात श्री. वसंतराव पळशीकर यांनी केलेला ऊहापोह या नवीन मजकुराचा समावेश आहे. सद्यःस्थितीत अत्यंत प्रस्तुत असलेला हा ग्रंथ आपल्या संग्रही हवाच.

---

पृष्ठे : २१५ किंमत रु. २००/-

संपर्क : चिटणीस, प्राज्ञपाठशाळा मंडळ, ३१५, गंगापुरी, वाई, जि. सातारा.

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded